**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नागपूर यांनी नागपूर-गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग (नागपूर जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी प्रस्तावित प्रकल्पाची दि. १६/०५/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नागपूर यांनी नागपूर-गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग (नागपूर जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता **क्रिष्णम लॉन्स ॲन्ड बँक्वेट, श्रीकृष्णनगर, आऊटर रिंग रोड च्या बाजुला, हुडकेश्वर, नागपूर-४४००३४** येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ११/०५/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचने प्रमाणें पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एक निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३)**. मंडळाचा आदेश क्र. ई-४२/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250515-FTS-0185 dtd.15/05/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४).**

..२/-

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत नागपूर-गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग (नागपूर जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. श्रीकांत देशपांडे, नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित द्रुतगती महामार्गाची आवश्यकता आहे काय? नागपूरहुन गोंदियाला जाण्यास पर्यायी मार्ग उपलब्ध आहे. | सद्यस्थितीत नागपूर ते गोंदिया प्रवासाला साधारणत: ३:१५ ते ३:३० तास लागतात. या रस्त्याबाबतची गरज आज जरी वाटत नसली तरी भविष्यात नक्कीच गरज भासणार आहे. याबाबत शासनाने अडव्हान्स्ड प्लानींग केलेली आहे. एमएसआरडीसीने याबाबत शास्त्रपुर्वक अभ्यास केलेला आहे व तद्नंतर शासनाने सर्व बाबींचा विचार करूनच या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. |
| २ | या द्रुतगती महामार्गामुळे पर्यावरण, झुडपे, जंगले, शेतजमीन व वन्यजीवांवर आघात होणार. विकासकामासाठी शेतजमीनीचा वापर होत असल्यामुळे शेतजमीन कमी होत आहे. या द्रुतगती महामार्गामध्ये किती वन जमीन अधिग्रहीत होणार. | कुठल्याही प्रकल्पाची अंमलबजावणी करावयाची असल्यास थोड्याफार प्रमाणात वृक्ष तोड करावी लागते. या प्रकल्पात साधारणत: १२.९३ हेक्टर वन जमीन जाणार आहे व इतर जमीनीवरीलही काही वृक्ष तोडण्यात येतील. याची भरपाई म्हणून महामार्गालगत ५.५० लक्ष वृक्ष लागवड नियोजीत आहे व त्यांनी जाहिर केले की, १० फुट पेक्षा जास्त उंचीची झाडे लावण्यात येतील. महामार्गाच्या मध्यकात झुडुपे लावण्यात येतील. |
| ३ | एमएसआरडीसीने विद्यमान समृध्दी द्रुतगती महामार्गाचे पर्यावरण विषयक परवान्याचे अनुपालन केलेले आहे काय? तसेच आतापर्यंत या महामार्गामध्ये १५० वन्यजीवांचे मृत्यु झाले. विद्यमान समृध्दी द्रुतगती महामार्गामध्ये एमएसआरडीसीने अंदाजे ८५० कोटी रूपयांची तरतुद वृक्ष लागवडीसाठी केलेली आहे. परंतु वास्तविक पाहता वृक्ष लागवड झाली नाही, असे दिसून येते. | प्रत्येक प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण विषयक परवान्याचे सहामाही अनुपालन अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. याबाबत एमएसआरडीसीने IIT मुंबई या संस्थेला नेमले आहे. IIT मुंबई तर्फे सर्व प्रकल्पांची गुणवत्ता तपासून अहवाल तयार केला जातो. सदर अहवाल प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना सादर केला जातो.<br><br>समृध्दी महामार्गाची लांबी ७०० कि.मी. आहे व वृक्ष लागवडीसाठी १५ लॅन्ड पॅकेजेसमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. यातील ८ पॅकेजेसचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. |

..३/-

| | | |
|---|---|---|
| ४ | द्रुतगती महामार्ग २५ फुट उंच करण्याची आवश्यकता आहे काय? महामार्गालगतच्या जमीनीचा पाण्याचा निचरा कसा होईल? त्यावर कोणती उपाययोजना केली आहे. | रस्त्याच्या दोन्ही बाजुला पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी जलवाहीनीची निर्मिती करण्यात येईल. या भागातील पर्जन्यामानाचा अभ्यास करून त्याप्रमाणे जलवाहीन्या बांधल्या जातील. तसेच महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल. समृध्दी महामार्गावर देखील असा प्रश्न उद्भवत असेल तर संबंधित शेतकऱ्यांनी एमएसआरडीसीच्या अभियंत्यास निदर्शनास आणून दयावी. त्यावर उपाययोजना करण्यात येतील. |

**२) श्री. सचिन खोब्रागडे.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान राष्ट्रीय महामार्ग पुरेसा आहे. प्रस्तावित द्रुतगती महामार्गाची आवश्यकता आहे काय, या द्रुतगती महामार्गामुळे पर्यावरणाचे नुकसान होणार व सार्वजनिक पैशांचा अपव्यय होणार. | सद्यस्थितीत नागपूर ते गोंदिया प्रवासाला साधरणत: ३:१५ ते ३:३० तास लागतात. या रस्त्याबाबतची गरज आज जरी वाटत नसली तरी भविष्यात नक्कीच गरज भासणार आहे. याबाबत शासनाने अडव्हान्स्ड प्लानींग केलेली आहे. एमएसआरडीसीने याबाबत शास्त्रपुर्वक अभ्यास केलेला आहे व तद्नंतर शासनाने सर्व बाबींचा विचार करूनच या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. |
| २ | प्रस्तावित द्रुतगती महामार्ग सार्वजनिक हिताचा आहे काय, आधीच अस्तित्वात असलेला रस्ता आहे. | |

**३) श्री. शेषराव मेश्राम, मांगली**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित द्रुतगती महामार्गाची आवश्यकता आहे काय, या द्रुतगती महामार्गामुळे पर्यावरणाचे नुकसान वं मानवी जीवनावर परिणाम होणार. | सद्यस्थितीत नागपूर ते गोंदिया प्रवासाला साधरणत: ३:१५ ते ३:३० तास लागतात. या रस्त्याबाबतची गरज आज जरी वाटत नसली तरी भविष्यात नक्कीच गरज भासणार आहे. याबाबत शासनाने अडव्हान्स्ड प्लानींग केलेली आहे. एमएसआरडीसीने याबाबत शास्त्रपुर्वक अभ्यास केलेला आहे व तद्नंतर शासनाने सर्व बाबींचा विचार करूनच या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. |
| २ | पर्यावरण नुकसानीमुळे लोकांना नुकसान भरपाई मिळणार काय? | मुद्द्याची नोंद घेण्यात आली. |

**४) श्री. राजेश भोवते, धानोरा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित द्रुतगती महामार्गामध्ये जर एखाद्याची एक एकर शेती जावून उर्वरीत एक आर शेती असेल तर उर्वरीत शेती कशी करायची, एवढ्या कमी शेतीची नोंदणी होईल काय? त्यामुळे उर्वरीत शेती देखील शासनाने खरेदी करावी. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी ८ फुटी रस्त्याचे बांधकाम करावे. | प्रस्तावित द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूला ३.५ मीटर रुंदीचे रस्ते बांधण्यात येतील. |
| ३ | शेतकऱ्यांची शेती द्रूतगती महामार्गामध्ये जाणार व शेतकरी भूमिहीन होणार तर त्यांच्या मुलांना नोकरी व सुविधा मिळणार काय? | मुद्द्याची नोंद घेण्यात आली. |

**५) श्री. मोहन येवले, लांजाळा, ता.कुही, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | शेतजमिनीच्या मुल्यनिर्धारण संदर्भात व मोजणीबद्दल माहिती मिळाली नाही. संबंधित माहिती देण्यात यावी. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |

**६) श्री. अंकीत अग्रवाल, रूही**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती येलो झोनमध्ये असून भरपाई प्रती एकरी मिळणार कि चौरस मीटर प्रमाणे मिळणार. शासनाचे दर व वास्तवित दर यात खूप तफावत आहे. मोबदला किती व कसा मिळणार. | शासनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय सदस्य असलेली समिती गठीत केली जाते व मोबदल्याबाबत सदर समिती निर्णय घेते. याबाबत एमएसआरडीसी निर्णय घेत नाही. |

**७) श्री. राहुल भांडारकर, माळणी, ता.कुही, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विकास आराखड्यात काही शिवधुरा, पांदण रस्ते, पावसाचे पाणी निचरा करण्यासाठी शासनाने तरतुद प्रस्तावित केली आहे काय? द्रुतगती महामार्गामुळे पावसाचे पाणी आडणार त्यामुळे जलवाहिन्याची व्यवस्था करावी. | महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट व अंडरपास देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल व महामार्ग ओलांडणे सोपे होईल. तसेच एखादा राष्ट्रीय किंवा राज्य मार्ग छेदत असेल तर त्यांच्यावरील वाहतुक बाधीत होणार नाही याची तजवीज घेण्यात आली आहे. |

**८) श्री. भोजराज बोन्द्रे, मांगली**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | शेती अधिग्रहण करण्याबाबत शासनाने परिपत्रक काढावे व याबाबतचे धोरण लेखी स्वरूपात शेतकऱ्यांना दयावे. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |
| २ | शेती गेल्यानंतर उर्वरीत शेतात जाण्याकरीता मार्ग करून दयावा. | प्रस्तावित द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूला ३.५ मीटर रुंदीचे रस्ते बांधण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ३ | मांगली गावामध्ये खसरा क्र. ४७ मध्ये ५ हिस्से आहेत. संपूर्ण खसरा क्र. ४७ चे अधिग्रहन केले आहे. यामध्ये कोणकोणत्या गट क्रमाकांचा समावेश होणार आहे याचे स्पष्टीकरण देण्यात यावे अथवा शासननिर्णय काढण्यात यावा. जी जमीन महामार्गामध्ये गेलेली आहे त्याच जमीनेची अधिग्रहण करण्यात यावे. जमीन अधिग्रहीत झालेली आहे काय याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे शेती करावी की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. अधिग्रहणाबाबतीत पुर्वीचा शासननिर्णय रद्द करून सुधारीत शासननिर्णय काढण्यात यावे. | जमीनीची मोजणी संयुक्तरित्या केली जाते व याचा निर्णय तालुका भूमी अभिलेख निरिक्षकांद्वारे देण्यात येतो. संयुक्त मोजणीनंतर तपशिलवार माहिती संकलित करण्याचे काम सूरू असून ही प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच याबाबत अंतिम निर्णय होईल. |

**९) श्रीमती.अनुसया काळे छाबरानी, नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान समृध्दी द्रुतगती महामार्गाचे पर्यावरण विषयक बाबींचे जसे वृक्ष लागवड व इतर उपाययोजनांचे अनुपालन केलेले आहे काय? याबाबत आढावा सादर करावा.<br>वृक्ष लागवडीसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झालेला असून देखील त्याप्रमाणे वृक्ष लागवड झाल्याचे दिसून येत नाही. | समृध्दी महामार्गाची लांबी ७०० कि.मी. आहे व वृक्ष लागवडीसाठी १५ लॅन्ड पॅकेजेसमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. यातील ८ पॅकेजेसचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. |
| २ | प्रस्तावित द्रुतगती महामार्गासाठी शेतजमिन कुठून व कशी अधिग्रहीत करणार याबाबत विस्तृत माहिती दयावी. | जमीनीची मोजणी संयुक्तरित्या केली जाते व याचा निर्णय तालुका भूमी अभिलेख निरिक्षकांद्वारे देण्यात येतो. संयुक्त मोजणीनंतर तपशिलवार माहिती संकलित करण्याचे काम सूरू असून ही प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच याबाबत अंतिम निर्णय होईल. |

**१०) श्री.विश्वास काळे, वडेगावं.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी काही जमीन उर्वरीत आहे. शासन त्या जमिनीचे संपादन करणार आहे. मा.उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे त्या प्रस्तावाचे उत्तर मिळावे. तसेच भूसंपादनात येत नसलेले क्षेत्रही मोजलेले आहे त्याचे कारण काय आहे? | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |

**११) श्री.ईश्वर तुळसकर, बोरी-नाईक**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती प्रस्तावित द्रुतगती महामार्गामध्ये गेलेली असून काही शेती जसे ५ आर/१० आर उरलेली आहे, तर या शेतीची नोंदणी होईल काय. या द्रुतगती महामार्गाबाबत जनतेला भाव व कोणत्या सवलती मिळणार याबाबत सांगावे. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |

..६/-

**१२) श्री. विनय धांडे, माळणी**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | जमीन अधिग्रहणाबाबतीत सरकारची काय योजना आहे. याबाबत माहिती शेतकऱ्यांना सादर करावी. संपादीत जमीनीचा लवकर निर्णय घेण्यात यावा. तसेच सदर जमीनीवर शेतकामे करावी की नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. मधातच शेतीचा ताबा सोडणार नाही. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |

**१३) श्री. उमेश धांडे, माळणी**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या प्रस्तावित द्रुतगती महामार्गालगत माझी ७/१२ प्रमाणे ४.२५ एकर शेती आहे. परंतु मोजणीप्रमाणे ३.३ एकर येत आहे. मोजणीमध्ये तफावत येत असल्यामुळे पुन्हा मोजणी करून मिळावी. | जमीनीची मोजणी संयुक्तरित्या केली जाते व याचा निर्णय तालुका भूमी अभिलेख निरिक्षकांद्वारे देण्यात येतो. संयुक्त मोजणीनंतर तपशिलवार माहिती संकलित करण्याचे काम सूरू असून ही प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच याबाबत अंतिम निर्णय होईल. |

अध्यक्ष, लोकसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांनी उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली याबाबत आभार प्रकट केले व उपस्थित केलेल्या मुद्द्यांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेवून शासनास सादर करण्यात येईल. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करणे किंवा दि.१७/०५/२०२५ पर्यंत म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे जमा करण्याबाबत सुचित केले. तसेच उपस्थित जनतेचे आभार मानले. त्यानंतर सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर